**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१८/२०२२.</u>**

**निशाणी क्र.१४ वरील आदेश**

(योगेश गणपत गुरव उर्फ सावंत वि. वैभव विष्णू गुरव उर्फ सावंत व.१५)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मुळ अर्जातील सामनेवाला क्र.१२ कै. मनोज शांताराम सावंत यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी म्हणून दिलेला आहे.

२. अर्जदार यांचे प्रस्तुत अर्जातील थोडक्यात कथन की, यातील सामनेवाला क्र.१२ मनोज शांताराम सावंत हे दि.२०/०३/२०२४ रोजी कांदिवली मुंबई येथे मयत झालेले आहेत. त्यांचे कौटूंबिक अडचणीमुळे तसेच वेळीच मृत्यूदाखला उपलब्ध करता न आल्याने त्यांना सदर सामनेवाला क्र.१२ यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर करता आले नाहीत. सदरचे वारस रेकॉर्डवर न घेतल्यास अर्जदार यांचे नुकसान होणारे आहे. सदरचे वारस रेकॉर्डवर घेण्यास १५ महिन्यांहून अधिक काळ इतका विलंब झालेला असून सदर सामनेवाला क्र.१२ यांचे विरुध्द दावा अबेट झालेला आहे. तरी झालेली अबेटमेंट सेट असाईड करुन मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर सामनेवालातर्फे म्हणणे देवून मे. न्यायालयाने योग्य ते आदेश पारीत करावेत असे नमुद केलेले आहे.

४. प्रस्तुत अर्ज, सामनेवालाचे म्हणणे व दोन्ही बाजूंकडील विद्वान विधीज्ञांच्या युक्तीवादाचे अवलोकन केले.

५. अर्ज व म्हणणे वाचले. मुळ दाव्यातील कागदपत्रांची पाहणी केली असता असे दिसून येते की, सदरचे सामनेवाला क्र.१२ कै. मनोज शांताराम सावंत हे दि.२०/०३/२०२४ रोजी मयत असल्याचे दिसते. तथापि, अर्जदार यांनी सदर विलंब माफीकरीता दिलेला अलाहिदा अर्जाने विलंब माफ करणेत आलेला आहे. अर्जदार यांचा अर्ज मंजूर केल्यास मुळ अर्जाचा गुणदोषांवर निकाल होणेसाठी मदतच होणार आहे. तसेच मयत

सामनेवाला क्र.१२ यांच्या कायदेशीर वारसांना सदर अर्जातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी पक्षकार म्हणून सामील करुन घेणे गरजेचे वाटते. मयत सामनेवाला क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे इतर सामनेवालांचे कोणतेही नुकसान उद्भवत नाही. सबब, न्यायाचे कारणास्तव खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज (**निशाणी क्र.१४**) मंजूर करणेत येतो.

२) प्रस्तुत अर्जाचे कामी सामनेवाला क्र.१२ मयत मनोज शांताराम सावंत यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल करणेत येतो.

दिनांकः–०४/०९/२०२५
ठिकाण – रत्नागिरी.

**(एस. एस. हाके)**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**राजापूर.**